अमरावती महानगरपालिका, अमरावती
भांडार विभाग

ई-निविदा सूचना

जा.क्र./अमनपा/भां.वि./उपा/२२६/२६. दि.२१/०९/२०२६.

मा. आयुक्त यांचे वतीने अमरावती महानगरपालिकेच्या भांडार विभागामार्फत वॉर्ड विकास / स्वेच्छा निधी / तातडीचा निधी / मनपा निधी तसेच इतर शासन निधीमधून खालील नमूदकेलेले साहित्य खरेदी करण्यासाठी ई-निविदा प्रणाली द्वारे ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे.

अ.क्र	कामाचे नाव	बयाना रक्कम	सुरक्षा रक्कम		कोऱ्या निविदा फॉर्मची रक्कम	कामाची मुदत
१	अमरावती महानगरपालिकेतील सन्मां. सदस्यांच्या वार्ड विकास/स्वेच्छा निधीमधून/तातडीचा निधी/मनपा निधी तसेच इतर शासन निधीमधून लोखंडी बेंचेसचा पुरवठा करणेबाबत. सोबत जोडलेल्या Specification नुसार.	१,९०,०००/-	३% सुरक्षा रक्कम FD स्वरूपात निविदा मंजूर झाल्यानंतर द्यावी लागेल.	२% सुरक्षा रक्कम देयकातून कपात करण्यात येईल.	१९,०००/- + १८% GST (परत न मिळणारी)	आदेश मिळाल्या पासून ३० दिवसात कामपूर्ण करून द्यावे लागेल.

ई-निविदा प्रसिद्धीचा तपशील

ई-निविदा प्रसिद्धि दिनांक	दि.०४/११/२०२६.
ई-निविदा दाखल करण्याची सुरवात दिनांक	दि.०४/११/२०२६. रोजी दु. १२.०० वाजे पासुन
ई-निविदा दाखल करण्याची अंतीम दिनांक	दि.१८/११/२०२६. रोजी दु. ४.०० वाजे पर्यंत
ई-निविदा उघडण्याची दिनांक (technical) and (financial)	दि.२०/११/२०२६. रोजी दु.४.०० वाजता शक्य झाल्यास
(financial) ई-निविदा उघडण्याची दिनांक व वेळMailव Sms द्वारे कळविण्यात येईल.	

ई-निविदेच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर दि.०४/११/२०२६ ला दुपारी १२.०० वाजेपासून पाहता येईल.

भांडार अधिक्षक
महानगरपालिका अमरावती

उपायुक्त-२
महानगरपालिका अमरावती

Scanned with OKEN Scanner

निविदा बाबतच्या अटी व अटी :-

१. ई-निविदेतील अनामत रक्कम निविदा फॉर्मची किंमत ऑनलाईन पद्धतीने भरावी लागेल. नगदीने स्वीकारल्या जाणार नाही.

२. करारनामा करताना लागणारी स्टॅम्प ड्युटी शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार भरावी लागेल.

३. अटी असलेल्या निविदाचा विचार केला जाणार नाही.

४. अनामत रक्कम भरल्यापासून कोणालाही सूट मिळणार नाही.

५. L-1 निविदाधारकाचे दर करारनामा झाल्यापासून एक वर्षापर्यंत बंधनकारक राहतील.

०६. पुरवठादारास साहित्य पुरवठा बाबतचे दर वस्तू व सेवा कर व इतर सर्व खर्चासह द्यावे लागतील.

०७. साहित्य पुरवठा दरात वस्तू व सेवा कराचे दर स्वतंत्र देणे आवश्यक राहील.

०८. TDS हा वस्तू व सेवाकर प्रमाणे देयकातून कपात करण्यात येईल.

०९. GST चा शासकीय कार्यालयात भरणा केल्याबाबतचा पुरावा आणि रिटर्न फाईल सादर करावे लागेल.

१०. GST नोंदणीकृत असलेल्या प्रत्येक वर्षी ५० लक्षांची वार्षिक उलाढाल मागील तीन वर्षात असल्याबाबतचे सनदी लेखापालाचे अहवाल सादर करणे आवश्यक राहील.

११. ई-निविदे सोबत द्यावयाचे कागदपत्रे PDF मध्ये द्यावे लागेल –

(तांत्रिक निविदेच्या लिफाफ्यामध्ये पुढील नमूद केलेल्या बाबी सादर कराव्या)

A. निविदा धारकाचे पूर्ण नाव , पत्ता ,दूरध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी.
B. मुंबई दुकाने व संख्या अधिनियम १९४८ अंतर्गत शॉप ॲक्ट नोंदणी प्रमाणपत्र.
C. बाजार व परवाना प्रमाणपत्र.
D. GST प्रमाणपत्र.
E. पॅन कार्ड व आधार कार्ड (साक्षांकीत केलेली छायाप्रत जोडावी.)
F. आयकर विवरणपत्र अद्यावत (चायांकित प्रत जोडावी). मागील ३ वर्षाची (FY २०२३-२४- FY २०२४-२५, FY २०२५-२६)
G. ३१ मार्च २०२६पर्यंत वस्तू व सेवाकर चे रिटर्न भरल्याचे चलान व प्रत अनिवार्य आहे.
H. काळ्या यादीस समाविष्ट नसल्याचे १०० रुपयाचे स्टॅम्पपेपरवर प्रतिज्ञापत्र (कार्यकारी दंडाधिकारी/ नोटरी)
I. निविदेतील अटी व शर्ती मंजूर असल्याबाबत १००/-रुपयाचे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र (कार्यकारी दंडाधिकारी/नोटरी)
J. तहसीलदार अथवा बँक यांचे कडील हैसियत प्रमाणपत्र (Solvenct Certificate) रु.२५,००,०००/-(पंचवीस लाख रुपये)
K. अनुभव प्रमाणपत्र (आवश्यक)
L. व्यवसाय कर अधिकारी यांचे मार्च २०२५ -२६ वर्षाचे कर भरल्याचे चलान प्रत.
M. मागील तीन वर्षामधील दर वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल किमान रु.५० लक्ष असणे आवश्यक आहे.
N. ५००/- रुपयाचे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञालेख. (सोबत संलग्न असलेले परिशिष्ट-१ सत्यप्रतिज्ञापत्र)
O. निविदा फी व अनामत रक्कम भरणा केल्याबाबतची पावती Upload करावी.

Scanned with OKEN Scanner

१२. सदर अटी व शर्ती मधील नमूद केलेल्या कागदपत्रांच्या स्कॅन प्रती PDF फॉर्म मध्ये ऑनलाईन भरणे आवश्यक राहील.

१३. साहित्य दराबाबतची माहिती लघोटा क्र.२ (दरा बाबतचा लघोटा) B.O.Q. मध्ये देण्यात यावे.

१४. तांत्रिक निविदा भरताना वरील नमूद वर्गवारी प्रमाणे आवश्यक असलेले दस्तऐवज सादर करावे. इतर दस्तऐवज सादर केल्यास त्याचा विचार करता येणार नाही.

१५.अपलोड करण्यात आलेली कागदपत्रे अस्पष्ट असल्यास मूळ कागदपत्रे तपासणी करिता उपलब्ध करून द्यावी लागेल.

१६. ई-निविदा मधील साहित्याचे परिमाण व अटी कमी जास्त करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांच्या कडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

१७. सुरक्षा रक्कम ३% निविदा मंजूर झाल्यावर फिक्स डिपॉझिट मध्ये उपायुक्त महानगरपालिका अमरावती यांच्या नावाने द्यावी लागेल.

१८. सदर ई-निविदा सादर करताना ५००/- रुपयाचे स्टॅम्प पेपरवर निविदेमध्ये सादर केलेली संपूर्ण माहिती खरी असल्याबाबतचा प्रतिज्ञालेख सादर करावा लागेल. प्रतिज्ञालेखाची प्रत सोबत संलग्न आहे.

१९. सदर साहित्याचा पुरवठा भांडार विभाग / बांधकाम विभागाने नेमून दिलेल्या ठिकाणी / झोन स्तरावरील उपअभियंता / शाखा अभियंता यांनी प्रमाणित केलेल्या ठिकाणी / संन्मा. सदस्यांनी सुचविलेल्या ठिकाणी पोहोस्त करून व फिटिंग करून द्यावे लागेल व संबंधित उपअभियंता अधिकारी यांच्या अहवालानंतर देयके अदा करण्यात येतील.

२०. ई-निविदा मधील सर्वच अटी व शर्ती कंत्राटदारास बंधनकारक राहतील.

२१. सदरचा दरकरार करारनामा झाल्यापासून १ वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर संपुष्टात येईल किंवा सदर निविदेची आर्थिक मर्यादा संपल्यानंतर करारनामा संपुष्टात येईल.

२२. निविदा बाबत काही अडचण असल्यास भांडार / बांधकाम विभागाशी संपर्क साधावा.

२३. कोणतेही कारण न देता सर्वच निविदा स्वीकारण्याचा व रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका अमरावती यांच्या कडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

२४. पुरवठा करण्यात येणाऱ्या साहित्य सुस्थितीत नमूद दिलेल्या ठिकाणी पोहोचून व फिटिंग करून द्यावे लागेल. त्यासाठी वेगळा कोणताच खर्च अ.म.न.पा. देणार नाही.

२६. ई-निविदे मध्ये सादर करण्यात येणारे लोखंडी बेंचेसचे दर हे किरकोळ बाजारातील दरापेक्षा जास्त नसावे.

२७. सदर लोखंडी बेंचेसचा पुरवठा जसजसा लागेल तसतसा मागणी नुसार / आवश्यक्रतेनुसार करावा लागेल.

२८. सन्मा. सदस्यांचे मागणीनुसार वेळोवेळी लागणारे लोखंडी बेंचेस पुरवठा करणे L-१ निविदाधारकास बंधनकारक राहील.

२९. ई-निविदेमधील साहित्याचे परिणाम व अटी कमी जास्त करण्याचा अधिकार मा. आयुक्त महानगरपालिका अमरावती यांचे कडे राखून ठेवण्यात आला आहे.

३०. पुरवठा करण्यात येणाऱ्या साहित्याचे दर GST, सर्व करासह व खर्चासह द्यावे लागेल. त्याकरिता मनपा कोणताच कर अथवा खर्च देणार नाही. तसेच साहित्याचा पुरवठा भांडार विभाग / बांधकाम विभागाने प्रस्तावित केलेल्या ठिकाणी पोहोच करून दयावे लागेल.

३१. सदर बेंचेसचा पुरवठा करताना काही तुटफूट झाल्यास त्याची सर्व जबाबदारी निविदा धारकाची राहील. तसेच तुटफूट झालेलं साहित्य स्वखर्चाने बदलून द्यावे लागेल.

Scanned with OKEN Scanner

३२. साहित्याचा पुरवठा सुस्थितीत करावा लागेल. तसे न केल्यास साहित्य स्वखर्चाने परत घेऊन जावे लागेल. त्याकरिता म.न.पा. कोणताच खर्च देणार नाही व त्या बाबतची कोणतीही तक्रार / जबाबदारी अ.म.न.पा. विचारात घेणार नाही.

३३. साहित्याचा पुरवठा करताना काही त्रुटी अथवा अडचण निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदा धारकाची राहील.

३४. साहित्य पुरवठा करताना काही भानगड निर्माण झाल्यास न्यायालयीन मर्यादा दिवाणी न्यायालय,अमरावती राहील.

३५. पुरवठा करण्यात येणाऱ्या साहित्याचे दोष दायित्व कालावधी (defect liability) ५ वर्ष राहील.

३६. सदर साहित्याचे सॅम्पल ऑनलाईन पद्धतीने निविदा भरल्यानंतर भांडार विभाग महानगरपालिका अमरावती येथे सादर करावे.

३७. साहित्य आवश्यक त्या स्पेसिफिकेशन नुसार पुरवठा करणे आवश्यक राहील. तसे नसल्यास देयक अदा करण्यात येणार नाही.

३८. साहित्य मनपा द्वारा सूचित केलेल्या ठिकाणी पुरवठा केल्याबाबत GEO TAG फोटो व झोन स्तरावरील उपअभियंता / सहाय्यक अभियंता यांचा अहवाल देयकासोबत सादर करणे अनिवार्य राहील.

३९. सदर साहित्याची Loding, Unloading करणे तसेच अन्य कोणत्याही कामी आपणास कोणत्याही प्रकारचे मनुष्यबळ पुरविले जाणार नाही. त्यासाठी निविदा व्यतिरिक्त अन्य कोणत्याही स्वरूपाचा खर्च दिला जाणार नाही.

४०. वरील पैकी कोणत्याही अटी अथवा शर्ती मध्ये संपूर्ण अभवा कोणत्याही भागाचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास सबधित कंत्राटदाराविरुद्ध शासकीय नियमानुसार व भारतीय न्याय संहिता (B.N.S) मधील उचित कलमानुसार कार्यवाही केली जाईल.

भांडार अधिक्षक
महानगरपालिका अमरावती

उपायुक्त -२
महानगरपालिका अमरावती

Scanned with OKEN Scanner

परिशिष्ट - १

सत्यप्रतिज्ञापत्र (affidavit)

मी _____ वय वर्ष _____ राहणार _____ या सत्य प्रतिज्ञापत्राद्वारे लिहून देतो की, मी _____ या फर्मचा/ मालक असून **अमरावती महानगर पालिकेच्या वतीने सन्मा. पदाधिकारी/सदस्यांचे वॉर्ड विकास / स्वच्छ निधी / तालुका निधी / मनपा निधी तसेच इतर शासन निधीमधून लोखंडी बेंचच्या जसेजसे लागेल तसेतसे पुरवठा करण्याबाबत.** या कामासाठी निविदा सादर करीत आहे.

त्या निविदेच्या लिफाफा क्र. 1 मध्ये जी कागदपत्रे सादर केली आहेत. ती खरी, बरोबर व पूर्ण आहेत, त्यामध्ये कोणत्याही त्रुटी, चुका नाहीत, याची मी खात्री केलेली असून असे शपथपूर्वक खालील अटी व शर्तीसह मान्य करीत आहे. या कागदपत्रामध्ये काही चुकीची दिशाभूल करणारी, खोटी व तसेच अपूर्ण माहिती आढळल्यास मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

1. जर कंत्राटी कालावधीत, मी, माझ्या कार्यालयाने किंवा माझ्या कर्मचाऱ्यांनी भांडार विभाग महानगरपालिका, अमरावती यांना कोणतीही खोटी माहिती किंवा देयकासंबंधित तसेच पत्र व्यवहारात खोटी/बनावट साहित्य खरेदीचे कागदपत्रे सादर केली असल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कारवाईस पात्र राहील.
2. जर कंत्राटी कालावधी दरम्यान आणि काम समाप्ती नंतर, अंतिम देयक देण्याच्या तारखेपर्यंत सादर केलेले कोणतेही कागदपत्रे खोटी/ बनावट किंवा फसवी आढळल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कारवाईस पात्र राहील.
3. जर काम समाप्तीनंतर दोष दायित्व कालावधी दरम्यान किंवा त्या नंतर कोणत्याही वेळी, कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे खोटी/ बनावट, फसवी किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

कंत्राटदाराची सही / शिक्का

Scanned with OKEN Scanner